भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.१९६/२०२२
तुकाराम वि. शासन व इतर
CNR-MHOS060003002022

## <u>निशाणी १५ खालील आदेश</u>

१. गैरअर्जदार क्र.३ यांनी मुदतीत लेखी कैफियत दाखल केली नसल्याने त्यांच्याविरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द करुन लेखी कैफियत दाखल करुन घेणेसाठी अर्ज केला आहे. त्यांचे म्हणणेनुसार ते शासकीय भुसंपादन अधिकारी असून कार्यालयीन कामाच्या व्यापामुळे व नजरचुकीमुळे त्यांना आपली लेखी कैफियत सादर करता आली नाही. त्यांनी कैफियत दाखल करण्यास जाणूनबुजून विलंब केलेला नाही. सदर अर्जावर अर्जदार यांनी तीव्र हरकत नोंदविली.

२. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकले. मुळ अर्ज हा भुसंपादन कायदा १८९४ चे कलम १८ प्रमाणे दाखल केला आहे. मुळ अर्ज गुणदोषांवर निकाली करणेसाठी गैरअर्जदार क्र.३ यांची लेखी कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेणे योग्य होईल. अर्जाच्या हकीकतींचा, त्यावरील अर्जदाराच्या म्हणण्याचा विचार करता त्यांना आपले म्हणणे सादर करणेसाठी एक संधी देणे योग्य होईल. म्हणून न्यायाच्या दृष्टीने मुळ अर्ज निकाली करण्याच्या उद्देशाने अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल, असे मला वाटते. सबब, गैरअर्जदार क्र.३ यांच्याविरुध्द पारित करण्यात आलेला 'विना म्हणणे/कैफियत' आदेश रद्द करण्यात येतो.

३. उभयता पक्षांनी आदेशाची नोंद घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SONIAJYOTI AJIT KANSHIDE
Date: 2023.02.16 11:19:26 +0530

दिनांक १४.०२.२०२३

( एस.ए.कानशिडे )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
उमरगा.

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of Stenographer : | L.S. Patil |
| Court Name : | Jt. Civil Judge, S.D. Omerga. |
| Date : | 14.02.2023 |
| Order signed by the Presiding Officer on : | 14.02.2023 |
| Order uploaded on : | 15.02.2023 |